नागपुरातील काँग्रेसमध्ये राजीनामा सत्र सुरुच! >>पान 2

पीएम किसान योजनेचा २१ वा हप्ता शेतकऱ्यांना रब्बीसाठी महत्वपूर्ण- कृषी मंत्री दत्तात्रय भरणे >>पान 3

स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक नगरपालिका निवडणूक खर्च समित्यांसाठी मार्गदर्शन सभा >>पान 4

**सुविचार**

हरलात तर काही बिघडत नाही, थांबलात तर सगळं संपतं.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 106 ■ गुरूवार, दि. 20 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




धुरंधर चित्रपटामधील अक्षय खन्नाचं फर्स्ट लूक रिलीज, रणवीर सिंगनं शेअर केलं पोस्टर

आतील पान

## 'स्थानिक' निवडणुकांवर आता मंगळवारी सुनावणी

**निवडणूक प्रक्रिया जैसे थे सुरू राहणार; एससीचे आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश**



**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावरुन टांगती तलवार कायम आहे. आरक्षणाच्या अंमलबजावणीत काही ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचा आरोप करत दाखल याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. मात्र, काही मुद्द्यांवर अधिक स्पष्टता आवश्यक असल्यामुळे ही सुनावणी आता मंगळवारपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. या कालावधीत कोणत्याही नव्या निवडणुकांची घोषणा होणार नाही.

आजच्या सुनावणीत काय घडलं?

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांशी संबंधित याचिकांची सुनावणी आता पुढील मंगळवारी होणार.

न्यायालयाने स्पष्ट केलं की, ही बाब निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंधित आहे, त्यामुळे सर्व तथ्ये समोर ठेवून निर्णय घ्यावा लागेल.

५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू केल्याचा आरोप अद्याप प्रलंबित असून कोर्ट या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहत आहे.

राज्य सरकारने कोर्टाला सांगितले की, महापालिका निवडणुकांची घोषणा अद्याप झालेली नाही, कारण आरक्षण निकष आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

पार्श्र्वभूमी: १७ नोव्हेंबरच्या सुनावणीत कोर्टाचा कडक इशारा

या प्रकरणात १७ नोव्हेंबरला झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने राज्य >>पान ४

## पूर्णा शहरात वाहनातले तीस लाख रुपये आचारसंहिता पथकाने केले जप्त, नगरपालिकांची निवडणूक रंगात येताच पैशाला फुटू लागले पाय

**परभणी/प्रतिनिधी :** नगरपालिकांची निवडणूक रंगात येताच आता पैशाला पाय फ ुटू लागले आहेत. पूर्णा येथील राजमुद्रा चौक परिसरात मंगळवारी (दि.१८) नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर एका वाहनातील ३० लाख रूपयाची रक्कम आचारसंहिता पथकाचे प्रमुख नारायण मिसाळ यांनी तपासणीअंती संशयित असल्यावरून जप्त केल्याची घटना घडली. आचारसंहिता पथक प्रमुख नारायण मिसाळ, विस्तार अधिकारी शिवानंद लेंडाळे, पुरी, राठोड यांचे तपासणी पथक साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास राजमुद्रा चौक परिसरात वाहन क्रम ांक एमएच २६ बी एक्सएक्स ६५९६ ची तपासणी केली असता वाहनातील बॅगमध्ये तीस लाख रुपयांची रक्कम आढळून आली. पथकाने संपूर्ण वाहनाचे चित्रीकरण करून पंचनामा करत रक्कम जप्त केली. जप्त रक्कम येथील कोषागार कार्यालयात जमा करण्यात आल्याची माहिती निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी दिली.

## धुळ्यातही भाजपचा नगराध्यक्ष बिनविरोध, राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा अर्ज बाद; शरयू भावसर यांची न्यायालयात धाव

**धुळे/प्रतिनिधी** :सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर आता धुळे जिल्ह्यातील दोंडाईच्या नगरपरिषदेतही भाजप नेत्या नगराध्यक्षपदी विजयी होणार असल्याचे निश्चित झाले आहे. कारण, भाजप नेते तथा मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्रींसह भाजपचे ७ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे, नयन कुवर रावल यांची येथील नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. कारण, महाविकास आघाडीच्या उमेदवार शरयू भावसार यांचा उम ेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेत अंतिमता अवैध ठरवण्यात आला. तांत्रिक कारणामुळे शरीर भावसार यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, आपण न्यायालयात धाव घेत असल्याचे त्यांनी म्हटले.दोंडाई नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर नगराध्यक्षपदासाठी महायुतीकडून मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्री नयन कुवर रावल यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यांच्यासमोर महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या शरयू भावसार यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला. मात्र, छाननी प्रक्रियेत शरयू भावसार यांचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी शरद मंडलिक यांनी अवैध ठरवला असून तांत्रिक कारणास्तव हा उमेदवारी अर्ज अवैध ठरवण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. त्याम ुळे, मंत्री जयकुमार रावल यांच्या मातोश्री नयन कुवर रावल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याविरुद्ध आता शरयू भावसार यांनी कोर्टात धाव घेतली आहे.

## नितीशकुमार आज १० व्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

**गांधी मैदानात शपथविधीसाठी २ व्यासपीठ, १५० पाहुणे, मोदींसह ११ राज्यांचे मुख्यमंत्री येणार**

**पाटणा : आज, गुरुवारी (२० नोव्हेंबर) गांधी मैदानावर नितीश कुमार मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. जेडीयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा यांनी ही माहिती दिली. (१९ नोव्हेंबर) जेडीयू विधिमंडळ पक्षाची मुख्यमंत्री निवासस्थानी बैठक झाली. नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली.**



भाजप त्यांच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड करण्यासाठी देखील बैठक घेणार आहे. त्यानंतर, एनडीएची दुपारी ३:३० वाजता विधानसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये बैठक होईल. जेडीयू कोट्यातून १३ मंत्र्यांची नियुक्ती होऊ शकते अशी चर्चा आहे.

एनडीए विधिमंडळ पक्षाची बैठक सेंट्रल हॉलमध्ये होईल. भाजप, जेडीयू, एलजेपी(आर), एचएएम आणि आरएलएमचे सर्व २०२ आमदार उपस्थित राहतील. नितीश कुमार, चिराग पासवान, संतोष सुमन, उपेंद्र कुशवाह, सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा देखील उपस्थित राहतील. सर्व पक्ष त्यांच्या निवडलेल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यावर चर्चा करतील. एनडीए नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करेल. विधिमंडळ पक्षाचे नेते झाल्यानंतर, मुख्यमंत्री नितीश कुमार राज्यपालांकडे राजीनामा सादर करतील आणि सरकार स्थापनेचा दावा करतील. ही संपूर्ण प्रक्रिया संध्याकाळपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

गांधी मैदानावर शपथविधी सोहळा होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे भजन लाल शर्मा आणि महाराष्ट्राचे देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार विजेते, शास्त्रज्ञ, साहित्यिक आणि इतर उपस्थित राहणार आहेत.

एनडीए शक्तीप्रदर्शन करणार, ३ लाख लोक जमणार

शपथविधी सोहळ्यासोबतच, एनडीए गांधी मैदानावर देखील शक्तीप्रदर्शन करणार आहे. ३ लाखहून अधिक लोकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. जेडीयू, भाजप, आरएलएसपी आणि एचएएमचे कार्यकर्ते आणि नेते यासाठी कामावर आहेत. प्रत्येक आमदार ५ हजार लोकांना पटना येथे घेऊन जाईल.

एसपीजीकडे सुरक्षा सोपवण्यात आली

पंतप्रधान नरेंद्र मोदी शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. परिणामी, एसपीजी गांधी मैदानाच्या सुरक्षेची जबाबदारी घेत आहे. २५० हून अधिक दंडाधिकारी, २५० पोलिस अधिकारी आणि २५०० हून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. गांधी मैदानाभोवती असलेल्या उंच इमारतींवर स्नायपर्स तैनात करण्यात आले आहेत.

## गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोलला भारतात आणलं



**सलमानच्या घरासमोर फायरिंग, बाबा सिद्धीकी हत्याकांडातील मुख्य आरोपी**

**मुंबई/प्रतिनिधी** : गँगस्टर लॉरेन्स बिश्र्नोईचा भाऊ अनमोलला आज बुधवारी अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले आणि दिल्लीला आणण्यात आले. त्याला विमानतळावर एनआयएने ताब्यात घेतले. त्याला पटियाला न्यायालयात हजर केले जाईल. अमेरिकेतून एकूण २०० जणांना हद्दपार करण्यात आले आहे, ज्यात भारतातील तीन जणांचा समावेश आहे. अनमोल व्यतिरिक्त, आणखी दोघे पंजाबचे आहेत. त्यांचा ठावठिकाणा अद्याप कळलेला नाही. गँगस्टर अनमोल हा एप्रिल २०२४ मध्ये बॉलिवूड स्टार सलमान खानच्या घरी झालेल्या गोळीबार घटनेतील एक वॉन्टेड आरोपी आहे. गेल्या वर्षी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकीच्या हत्येतील तो मुख्य आरोपी आहे. २०२२ मध्ये पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला यांच्या हत्येतही अनमोलचे नाव समोर आले होते. अनमोलला अमेरिकेत >>पान ४

## तुम्ही निवडणूक आयोगाची प्रतीमा मलीन करताय

**२७२ निवृत्त न्यायाधीश आणि अधिकाऱ्यांचे राहुल गांधींना पत्र**

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : देशभरातील २७२ निवृत्त न्यायाधीश आणि नोकरशहांनी निवडणूक आयोगावर कथित मतदान हेराफेरीचा आरोप करत एक खुले पत्र जारी केले. त्यात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर टीका करण्यात आली. या पत्रावर १६ माजी न्यायाधीश, १२३ निवृत्त नोकरशह (१४ माजी राजदूतांसह) आणि १३३ निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी आहे. काँग्रेस पक्ष सतत निवडणूक आयोगासारख्या संवैधानिक संस्थांची विश्र्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्न करत आहे, देशाच्या लोकशाही व्यवस्थेत अनावश्यक अविश्र्वास पसरवत आहे, असे या पत्रात म्हटले आहे.

पत्रात असेही म्हटले आहे की निवडणूक आयोग हा भारताच्या निवडणूक व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित करणे जनतेचा विश्र्वास कमी करते आणि लोकशाहीला हानी पोहोचवते. राजकीय मतभेद आवश्यक आहेत, परंतु सतत संवैधानिक संस्थांवर आरोप करणे राष्ट्रीय हिताच्या विरुद्ध आहे.

राहुल गांधी यांनी आतापर्यंत तीन पत्रकार परिषदा घेतल्या आहेत ज्यात निवडणूक



आयोगावर मतदान हेराफेरीचा आरोप केला आहे. त्यांनी आयोगाला मोदी सरकारची बी टीम देखील म्हटले आहे. भाजपशी संगनमत करून मतांची चोरी केल्याचा त्यांच्यावर आरोप होता.

पत्रातील ५ महत्त्वाचे मुद्दे...

प्रथम, लष्कर, नंतर न्यायव्यवस्था आणि संसदेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आणि आता निवडणूक आयोगाला लक्ष्य केले जात आहे. ही एक धोकादायक प्रवृत्ती बनली आहे ज्यामध्ये निवडणूक पराभव लपविण्यासाठी संस्थांच्या विश्र्वासार्हतेवर हल्ला केला जातो.

राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मत चोरी केल्याचा आरोप केला, त्याला देशद्रोह म्हटले आणि अधिकाऱ्यांना धमकावले, तरीही त्यांनी कोणतीही अधिकृत तक्रार किंवा प्रतिज्ञापत्र सादर केले नाही. हा केवळ राजकीय संताप आहे ज्याचा कोणताही ठोस आधार नाही.

विरोधी पक्ष जिंकले की निवडणूक आयोगावर कोणतेही आरोप केले जात नाहीत, परंतु ते हरताच आयोगावर दोषारोप होऊ लागतात. हा राजकीय संधीसाधूपणा आहे.

टीएन शेषन आणि एन गोपालस्वामी सारख्या माजी मुख्य निवडणूक आयुक्तांनी आयोगाला एक मजबूत आणि निष्पक्ष संस्था बनवली आहे, म्हणून आज त्यावर निराधार हल्ले लोकशाहीसाठी हानिकारक आहेत.

सर्व भारतीयांनी निवडणूक आयोग आणि इतर संवैधानिक संस्थांवर विश्र्वास ठेवला पाहिजे. ते म्हणाले की, बनावट मतदार, नागरिक नसलेले आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना मतदार यादीतून बाहेर ठेवणे हे देशाच्या सुरक्षिततेसाठी आणि लोकशाहीसाठी आवश्यक आहे.

या स्वाक्षऱ्या १६ माजी न्यायाधीशांच्या आहेत. ज्यात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे अध्यक्ष आदर्श कुमार गुप्ता, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश हेमंत गुप्ता, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि रॉचे माजी प्रमुख संजीव त्रिपाठी आणि एनआयएचे माजी संचालक योगेश चंद्र मोदी यांच्यासह १२३ निवृत्त नोकरशहा (१४ माजी राजदूतांसह) आणि १३३ निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## भगवान हनुमानावरचे वक्तव्य एसएस राजामौलींना भोवले; हिंदू सेनेकडून एफआयआर दाखल, भावनांना ठेस पोहोचवल्याचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** फिल्म इंडस्ट्रीचे दिग्गज दिग्दर्शक एसएस राजामौली भगवान हनुमानावर केलेल्या एका वक्तव्यामुळे अडचणीत सापडले आहेत. एसएस राजामौलींविरोधात हिंदू सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी त्यांच्याविरुद्ध दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत असे म्हटलेय की, राजामौली यांनी भगवान हनुम ानाबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली, ज्यामुळे हिंदू समुदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या. दरम्यान, १७ नोव्हेंबर रोजी हैदराबादमध्ये एसएस राजामौली यांच्या 'वाराणसी' चित्रपटाच्या ट्रेलर लाँच दरम्यान ही घटना घडली. 'वाराणसी' चित्रपटाच्या ट्रेलर लाँच दरम्यान तांत्रिक बिघाड झाला. त्यावेळी या गोंधळावर राजमौली म्हणाले की, ''माझा देवावर फारसा विश्वास नाही. हा माझ्यासाठी एक भावनिक क्षण... माझे वडील आले आणि म्हणाले की, हनुमान माझ्यासाठी सर्व गोष्टी सांभाळून घेतील. पण ही गडबड झाल्यावर मला त्यांच्यावर राग आला. मी त्यांना म्हणालो, 'हनुमान अशा पद्धतीनं मार्गदर्शन करतात का?'' ''माझी पत्नी हनुमानाची खूप मोठी भक्त आहे. ती त्यांच्याशी आपल्या मित्राशी बोलल्यासारखी बोलते. तांत्रिक बिघाड झाल्यावर मी तिच्यावरही राग व्यक्त केला आणि विचारले, 'हनुमान असे वागतात का?'', असं राजामौली पुढे बोलताना म्हणाले. राजामौली यांचे हे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल झालंय आणि त्यांच्यावर बरीच टीका झाली. लोकांनी त्यांच्या या वक्तव्याला धार्मिक भावनांचा अपमान आणि हनुमानाच्या श्रद्धेचा अपमान म्हटलंय.



## फ्लाईंग शीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांची आज जयंती. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले त्यांच्या त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. मिल्खा सिंग यांना जयंतीदिनी विनम्र आदरांजली!

# नागपुरातील काँग्रेसमध्ये राजीनामा सत्र सुरुच!

## पक्षात सुनील केदारांची हुकूमशाही; बड्या नेत्यांसह कार्यकर्त्यांचा पक्षाला रामराम

दैनिक आपला विदर्भ





**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील काँग्रेसची गटबाजी थांबण्याचे नाव घेत नाही. अशातच आता वाडी नगरपरिषदेत शहर अध्यक्ष शैलेश थोराने यांना पक्षाकडून नगराध्यक्ष पदाची तिकीट नाकारताच शैलेश थोराने सहा १२० कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिलाय. यात नागपूर तालुका अध्यक्ष प्रकार कोकाटे, जिल्हा काँग्रेसचे महासचिव काँग्रेसचे अनिल पाटील यांचा समावेश आहे. आपण सुनील केदार यांच्या हुकूमशाही धोरणाला कंटाळून राजीनामा देत असल्याचे या पदाधिकाऱ्यांनी प्रदेश काँग्रेसला पाठवलेल्या पत्रात सांगितलय. त्यामुळे दिवसागणिक नागपूर काँग्रेसमध्ये नाराजीचा सूर वाढत असून हि गळती रोखाने आता काँग्रेस नेतृत्वापुढचं आव्हान असणार आहे.

राज्यात सध्यास्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहत आहे. अशातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर नागपूर काँग्रेसमध्ये राजीनामा सत्र सुरु असल्याचे चित्र आहे. साध्य नागपूर ग्रामीण काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात राजीनामा सत्र व पक्षांतर सत्र सुरु असून याला काँग्रेस नेते सुनील केदार यांच्या मनमर्जी कारभाराला जबाबदार धरले जात आहे. धक्कादायक म्हणजे काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातून घेत ज्या प्रेम झाडे यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली, त्याच प्रेम झाडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून देखील वाडीच्या नगराध्यक्ष पदाचा अर्ज भरला आहे. त्यामुळे या नाराजीनाट्याला थांबवण्यासाठी काँग्रेस नेतृत्व काही पाऊले आता उचलतात का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

सध्या नागपूर जिल्ह्यात माजी मंत्री सुनील केदार यांच्या नेतृत्वाला घेऊन प्रचंड रोष पाहायला मिळत आहे. सुनील केदार यांच्या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे मोठ्यासंख्येने काँग्रेसचे पदाधिकारी पक्षाच्या सदस्यपदाचे राजिनामे देत आहे. राजीनामे देतांना प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुनील केदारची यांची तक्रार करत हे राजीनामे देत आहे.

आज महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी विधानसभेत काँग्रेस कार्यकारणीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. दोन दिवसाआधी कामठी विधासभेतील मोठा चेहरा व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव प्रसन्ना तिडके यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला होता. या सर्वाचे खापर त्यांनी सुनील केदार यांच्यावर फोडलं आहे. त्यामुळे पुढील काळात सुनील केदार यांच्या पक्षाकडून शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सुनील केदार यांच्या काय रोष आहे.

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना राजभवन येथे अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या १०८ व्या जयंती दिनी राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले.

यावेळी राज्यपालांच्या खासगी सचिव अर्चना गायकवाड व राज्यपालांच्या अवर सचिव (प्रशासन) (प्र.) करुणा वावडणकर यांनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती राष्ट्रीय एकात्मता दिवस म्हणून साजरी करण्यात येते.

## कुख्यात नक्षली हिडमासह ६ नक्षलवाद्यांचा खात्मा; सामान्यांचा फटाके फोडून उत्साह

**छत्तीसगड :** सलग दुसऱ्या दिवशी माओवाद्यांविरोधी कारवाईला मोठं यश आले आहे. आंध्र प्रदेश, ओडीसा, छत्तीसगड या तीन राज्यांच्या सीमेवर आंध्रप्रदेश पोलिसांच्या ग्रे हाउंड या विशेष पोलिस पथकाच्या कारवाईमध्ये माओवाद्यांचा खात्मा झाला आहे. आज झालेल्या कारवाईत सात माओवादी मारले गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये मेट्टुरी जोगाराव उर्फ टेक शंकर हा केंद्रीय समिती सदस्य, तसेच डिव्हीसीएम असलेल्या सीता उर्फ ज्योती या २ मोठ्या माओवादी नेत्यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत इतर पाच माओवादी ही या चकमकीत मारले गेल्याची माहिती आहे.

आंध्र प्रदेश सीमेवर सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये मोठी चकमक झाल्याचे वृत्त समोर आले आहे. प्राथमिक माहितीनुसार या चकमकीत अनेक नक्षलवादी ठार झाले आहेत. बस्तरचे महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी पुष्टी केली की, आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम जिल्ह्यातील मरेदपल्ली येथे मंगळवारी सकाळी झालेल्या चकमकीत नक्षलवादी कमांडर हिडमा, ज्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस होते, तो मारला गेला. या चकमकीत एकूण सहा नक्षलवादी मारले गेल्याचे वृत्त आहे. महानिरीक्षकांच्या मते, ४० लाख रुपयांचे बक्षीस असलेले हिडमाची पत्नी राजे, ज्याच्यावर ४० लाख रुपयांचे बक्षीस होते, ती मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये होती. छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात तसेच बस्तरमधील अनेक ठिकाणी हिडमा आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या सलग दोन दिवस झालेल्या एन्काऊंटरनंतर सामान्य ग्रामीण जनतेने फटाके फोडून आनंद व्यक्त केला आहे.

### मुंबई उपनगर व मुंबई शहर जिल्ह्यासाठी जिल्हा अग्रणी बँकेमार्फत

## हक्क न सांगितलेल्या मालमत्तेच्या निपटाऱ्याकरिता २१ नोव्हेंबर रोजी शिबिरांचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उपनगर व मुंबई शहर जिल्ह्यामध्ये जिल्हा अग्रणी बँकेद्वारे हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा करण्याकरिता २१ नोव्हेंबर रोजी शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश विविध बँका व वित्तीय संस्थांमध्ये दीर्घकाळापासून निष्क्रिय असलेल्या ठेवी, शेअर्स, लाभांश, विमा पॉलिसी, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) इत्यादी मालमत्तेबाबत जनजागृती करणे आणि योग्य हक्कदारांना त्यांच्या मालमत्तेबाबत माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आहे.

या शिबिराद्वारे नागरिकांना विविध बँकांच्या निष्क्रिय खात्यांची माहिती व पडताळणी, दाव्याची प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन, संबंधित बँकांचे प्रतिनिधी व अधिकारी यांच्याशी थेट संवादाची संधी, ऑनलाइन पोर्टलद्वारे मालमत्तेची तपासणी करण्यास मदत या सेवा उपलब्ध करून देण्यात येतील.

राज्यस्तरीय बँकर्स समितीच्यावतीने आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी या शिबिरात सहभागी होऊन आपली किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांची ठेवी व मालमत्ता तपासावी आणि आपल्या हक्काचा दावा सादर करावा. या शिबिराद्वारे नागरिकांना त्यांच्या आर्थिक हक्कांविषयी जागरुकता निर्माण होऊन निष्क्रिय मालमत्ता योग्य हक्कदारांपर्यंत पोहोचविण्यात मदत होईल.

शिबिरांची ठिकाणे :-

मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी

मुंबई उपनगर उत्तर भारतीय संघ, ६२९/ १२४३, टीचर्स कॉलनीच्या मागे, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ सकाळी १०.०० वा ते दुपारी ०२.०० पर्यंत मुंबई शहर जिल्ह्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृह, नरिमन पॉईंट मुंबई येथे दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी शुक्रवारी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शिबिरादरम्यान बँकिंग क्षेत्रतील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित संस्था उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करतील.मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या शिबिरात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## धुरंधर चित्रपटामधील अक्षय खन्नाचं फर्स्ट लूक रिलीज, रणवीर सिंगनं शेअर केलं पोस्टर

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध निर्माता–दिग्दर्शक आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर चित्रपट बऱ्याच दिवसांपासून चर्चेत आहे. या चित्रपटात रणवीर सिंग एका धमाकेदार भूमिकेत दिसणार आहे. गेल्या काही दिवसांपासून, रणवीर सिंगचे या चित्रपटामधील अनेक पोस्टर्स समोर आले. तसेच या चित्रपटामधील संजय दत्त, आर. माधवन आणि अर्जुन रामपाल यांचे लूक समोर आले आहेत. १७ नोव्हेंबर रोजी रणवीर सिंगनं पुन्हा धुरंधर चित्रपटातील अक्षय खन्नाचा पॉवरफुल लूक शेअर केला. आता हा लूक पाहून चाहत्यांमध्ये आणखी उत्साह वाढला आहे. सोशल मीडियावर सर्वजण अक्षय खन्नाच्या लूकचे कौतुक करत आहेत.अक्षय खन्नाचं धुरंधर चित्रपटातील फर्स्ट लूक आलं समोर : रणवीर सिंगनं अक्षय खन्नाच्या फर्स्ट लूकचे अनावरण करणारे पोस्टर शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलंय,द सुप्रीम हंटर. पोस्टर शेअर करताना रणवीर सिंगनं असेही जाहीर केलं की, धुरंधर चित्रपटाचा ट्रेलर उद्या, १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२:१२ वाजता प्रदर्शित होईल. तसेच हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी रुपेरी पडद्यावर रिलीज होणार आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा टीझर हा समोर आला होता. या चित्रपटाचा टीझर खूप थरारक होता. यामध्ये रणवीर धमाकेदार अंदाजात दिसला. आता या चित्रपटाचा टीझर पाहिल्यानंतर रणवीर सिंगचे चाहते धुरंधर पाहण्यास उत्सुक आहेत.

# कुष्ठरोग शोध मोहिमेंतर्गत निपाणा ग्रामसभेत 'कुष्ठरोग मुक्त गाव' संकल्प

दैनिक आपला विदर्भ







**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव देवी अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत निपाणा येथे कुष्ठरोग शोध मोहिमेच्या अनुषंगाने मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रामसभा उत्साहात पार पडली. सरपंच संतोष तांदुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी एकत्रितपणे 'कुष्ठरोग मुक्त गाव' करण्याचा संकल्प करत मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दिनांक १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय मोहिमेत निपाणा ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याने गाव कुष्ठरोग मुक्तीसाठी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या प्रसंगी मोताळा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अंकिता इंगळे, डॉ. प्रवीण लहाने, आरोग्य कर्मचारी श्रीमती दादेराव, ग्रामपंचायत सदस्य जोशी, ग्रामसेवक श्री सुरडकर, आशा स्वयंसेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामसभेत कुष्ठरोगाविषयी जनजागृती, घराघरात तपासणी, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर उपचार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे निपाणा गावाने आरोग्यदायी आणि रोगमुक्त समाज निर्मितीकडे भक्कम पाऊल टाकले असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## युपीएससी व्यक्तिमत्व चाचणीसाठी बार्टीकडून २५ हजारांचे अर्थसहाय्य बार्टी महासंचालक सुनील वारे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तर्फे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युपीएससी नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी २०२५ साठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एकरकमी आर्थिक सहाय्य योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र उमेदवारांना बार्टीमार्फत २५ हजार रु. एकरकमी अर्थसहाय्य दिले जाणार असल्याची माहिती बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी दिली.

या योजनेच्या लाभासाठी उमेदवार महाराष्ट्रातील कायमस्वरूपी रहिवासी आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार युपीएससी नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी २०२५ साठी पात्र ठरलेला असावा. अर्जाचा नमुना http://barti.maharashtra.gov.in → NOTICE BOARD या लिंकवर उपलब्ध असून उमेदवारांनी अर्ज डाउनलोड करून भरल्यानंतर आवश्यक स्व-साक्षांकित कागदपत्रांसह ई-मेलद्वारे पाठवायचा आहे. आवश्यक कागदपत्रांमध्ये जात दाखला, जात वैधता, डोमिसाईल प्रमाणपत्र, डीएएफ-, आधार कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) बँक पासबुक प्रत, यूपीएससी मुख्य परीक्षेचे प्रवेशपत्र यांचा समावेश आहे.

पूरक कागदपत्रांसह संपूर्ण अर्ज स्कॅन करून upscbartischeme@barti.in या ई-मेलवर पाठवावा. सर्व कागदपत्रे स्व-साक्षांकित असणे बंधनकारक आहे.

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर आहे. अधिक माहितीसाठी ०२०-२६३४३६०० / २६३३३५९७ या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा. अधिकाधिक पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी केले आहे.

# पीएम किसान योजनेचा २१ वा हप्ता शेतकऱ्यांना रब्बीसाठी महत्वपूर्ण- कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### महाराष्ट्रातील ९० लाखाहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात १ हजार ८०८ कोटी २५ लाख थेट जमा

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** ''केंद्र सरकार व राज्य सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यापूर्वी राज्य शासनानेही अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत म्हणून भरीव रक्कम वितरित करण्याचे काम केले आहे. या नवीन २१ व्या हप्त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना लागवड, बियाणे, उपजीविका आणि इतर कृषी खर्चासाठी आवश्यक तातडीचे आर्थिक बळ मिळणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या महत्वाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेअंतर्गत देशभरातील पात्र शेतकऱ्यांसाठी २१ वा हप्ता वितरीत करण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हा हप्ता देशातील लाखो शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा झाला. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना रब्बी हंगामात मदत होणार आहे. पीएम-किसान योजना शेतकऱ्यांना निश्चित वार्षिक उत्पन्न सहाय्य मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ६,००० रु. इतकी आर्थिक मदत दिली जाते. ही मदत २,००० रु. च्या तीन समान हप्त्यांमध्ये थेट डीबीटी माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा केली जाते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, पीएम-किसान योजनेचा २१ वा हप्ता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या निधीमुळे रब्बी हंगामाच्या तयारीला मोठी मदत मिळेल. केंद्र सरकारकडून मिळणारे वेळेवरचे आर्थिक सहाय्य हे शेतकऱ्यांच्या स्थिर उत्पन्न व आर्थिक सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहे. योजनेच्या अंमलबजावणीत विभागामार्फत पूर्ण पारदर्शकता व समन्वय राखला जात आहे. देशभरातील शेतकरी पीएम-किसान च्या हप्त्याची प्रतिक्षा करत असताना, देण्यात आलेला २१ वा हप्ता रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.''

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेला माहितीनुसार, ९०,४१,२४१ पात्र शेतकरी कुटुंबांच्या खात्यात १ हजार ८०८ कोटी २५ लाखांची रक्कम जमा होणार आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी विभाग, महसूल विभाग तसेच बँकिंग यंत्रणेने समन्वय राखत हप्त्याचे वितरण वेळेवर पार पाडण्यासाठी तयारी पूर्ण केली आहे. तसेच, शेतकऱ्यांना हप्ता मिळण्यासंदर्भात तपासण्यासाठी अधिकृत पोर्टल आणि मोबाइल ॲपद्वारे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

मंत्री श्री. भरणे म्हणाले, 'पीएम-किसान' ही देशातील सर्वात व्यापक थेट आर्थिक सहाय्य योजना मानली जाते. योजनेमुळे शेतकऱ्यांच्या हातात नियमित अंतराने रोख रक्कम उपलब्ध होते, ज्यामुळे कर्जाची गरज कमी होते तसेच शेतीतील तातडीच्या खर्चाला मदत मिळते. मागील हप्त्यांमध्ये डीबीटी प्रक्रियेचे पारदर्शक व्यवहार, लाभार्थ्यांच्या माहितीचे आधार सीडिंग आणि बँक पडताळणीमुळे योजना अधिक सक्षम झाली आहे. तसेच, नियमित आर्थिक सहाय्यामुळे लहान व मध्यम शेतकऱ्यांना त्यांच्या हंगामी आर्थिक नियोजनात दिलासा मिळतो आणि शेतकरी कुटुंबांच्या उपजीविका सुरक्षित राहण्यास मदत होते.''

## शासकीय जागेवरील गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासातील अडचणी दूर करणार- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रक्रियेला गती देण्याचे शासनाचे धोरण आहे. या अनुषंगाने स्वयं पुनर्विकासासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यात येतील, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गृहनिर्माण संस्था पुनर्विकास धोरणासंदर्भात मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय वांद्रे येथे बैठक झाली. या बैठकीस सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, स्वयं पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा आमदार प्रवीण दरेकर, राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, मुंबई शहर तसेच उपनगरातील खासदार, आमदार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मुंबई शहर जिल्हाधिकारी आँचल गोयल, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी झालेल्या चर्चेत शासकीय जागेवरील स्वयं पुनर्विकासाला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. स्वयं पुनर्विकास करताना महसूल व नगरविकास विभागांच्या नियमांमध्ये सवलत देण्यात यावी. शासकीय जमिनीबरोबरच इतर शासकीय यंत्रणेच्या जागेवरील स्वयं पुनर्विकासालाही प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यासाठी एक नोडल एजन्सी नियुक्त करण्यात यावी, स्वयं पुनर्विकासासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या मिळविण्यासाठीची प्रक्रिया सुलभ करण्यात यावी, स्वयं पुनर्विकास करताना या योजनेचा कोणीही गैरफायदा घेऊ नये यांची दक्षता घेतली जावी, याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने विभागाने प्रस्ताव तयार करून तो मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवावा, असे निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी होऊ इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी मोफत प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदासाठी होणाऱ्या सर्विस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) मुलाखतीची पूर्वतयारी करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात एसएसबी कोर्स क्रमांक ६४ आयोजित करण्यात आला आहे. हा कोर्स १५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत होणार असून प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास व भोजनाची सोय उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी १० डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारांनी सैनिक वेलफेअर विभाग, पुणे (डीएसडब्ल्यू) यांच्या संकेतस्थळावरून एसएसबी-६४ कोर्सचे प्रवेशपत्र व परिशिष्टे डाउनलोड करून पूर्ण भरून सोबत आणणे आवश्यक आहे.

एस.एस.बी. प्रशिक्षण कोर्ससाठी खालीलपैकी कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे.

कम्बाईड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन (सीडीएसई-यूपीएससी) किंवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी एक्झामिनेशन (एनडीए-यूपीएससी) परीक्षा उत्तीर्ण असणे व एसएसबी मुलाखतीसाठी पात्रता मिळालेली असणे आवश्यक आहे.

एनसीसी 'सी' प्रमाणपत्र 'ए' किंवा 'बी' ग्रेडसह उत्तीर्ण असणे तसेच एसएसबी या पदासाठी एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून शिफारस असणे आवश्यक. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबीसाठी मुलाखतीचे कॉल लेटर असणे आवश्यक.

विद्यापीठ प्रवेश प्रणाली (यूईएस) साठी एसएसबी कॉल लेटर असणे किंवा शिफारस यादीत नाव असणे आवश्यक.

प्रशिक्षण केंद्राबाबत अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी खालील माध्यमांतून कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल

ईमेल :training.pctenashik@gmail.com दूरध्वनी : ०२५३-२४५१०३२, व्हॉट्सॲप: ९१५६०७३३०६ अधिकाऱ्यांनी इच्छुक युवकयुवतींनी या मोफत प्रशिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शब्दकोडे क्र. 14

आडवे शब्द

१. पहारेकरी ६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास १२. माळ, हार १३. नडलेला, गरजू १४. डाळीचे कालवण १५. सांभाळ, संगोपन १७. गवताचे रुंद पान १८. वेल २०. शंभर २२. प्रचंड २४. आई २५. गगन २७. हद्दपार, वगळलेला २८. कोय २९. रोटीचे एक धान्य ३०. एक त्रिदल ३१. आवेशाने पुढे जाणे ३३. पोट ३४. सैन्याचा मालपुरवठा ३६. चिखलाची भुसभुशीत जमीन ३७. श्रीकृष्णाचे एक नाव ३८. रममाण, निमग्न ४०. कबूतर ४१. पुष्कळ ४३. हिंदुस्थानी ४५. भित्रा ४८. एक महाकाय प्राणी ४९. कुंभाराची भट्टी ५१. आत्मियता, करुणामय प्रेम ५२. पुरुष ५३. आकडेमोडीचे शास्त्र ५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू' ५६. ठाकरे पुत्र ५८. भडीमार ५९. भीती ६१. रक्ताचा नात्यातील ६२. रतिचा पती ६५. आमनेसामने ६८. समुद्र ७०. ग्रामीण बोलीत तेव्हा ७१. जिम्मेदारी ७२. वेळ घालवणे ७४. अभिनेता ७५. त्वरित ७६. चप्पल ७७. गाय ७८. परंतु

उभे शब्द

१. जीभ. जिव्हा २. गाढव ३. निकट ४. दरवाजा ५. रात्र ६. हेतू-कारण ७. अंगावरील बारीक केस ८. फिर्याद, अर्ज ९. वाळवंट १०. धरण, सरोवर, विहीर इ. ११. संगीतातील एक राग १६. नकला करणारा १७. सरसरीत १९. धातूचा धागा २१. मध २२. सततचे नामस्मरण २३. प्रत्येक वर्षी २४. बिनविजेचा 'फ्रीज' २५. आपला परका अशी भावना २६. कपाळ २८. स्वाभिमानी २९. इंग्रजी आई ३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र ३२. दात ३३. अगरबत्ती ३५. वेळ, फुरसत ३६. डोंगराचा तुटलेला कडा ३९. जरच्या बरोबरचा शब्द ४२. दाक्षिणात्य आमटी ४४. धनुष्यबाण ४६. भरीव नसलेले ४७. शिखराचे टोक ४९. व, आणखी ५०. कडक व चिवट ५२. एक क्षार ५४. फणसातील खाद्यभाग ५६. नाहक ५७. न्यूनता, कसर ६०. रसाळ ६१. मंत्रीमंडळ ६३. औषध ६४. हाकाटी, आरडाओरड ६६. मराठीत बाथरूम ६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख ६८. हिंमत, धैर्य ६९. तीव्र ऊन ७३. विहीर ७४. शर्त



### शब्दकोडे क्र. 13 चे उत्तर

आडवे उत्तर

१.नराधम ४.सरकार ७.कासार १०.दारा ११.मस्त १२.करवत १४.यच्चयावत १५.फारकत १६.पत १७.नवनीत २०.लाचार २२.बाला २३.मालक २५.घड २६.संपादकीय २८.नटराज ३०.बक ३२.तर ३३.नवस ३४.लयबद्ध ३५.भगवान ३७.वाचा ३९.कल ४२.रजई ४३.राजाराणी ४४.न्यायालय ४५.हत्या ४६.गंधक ४८.काजवा ४९.टपोरा ५१.जागर ५२.लता ५४.पर्वत ५६.चपापणे ५८.उदार ५९.अवसर ६०.बेसुमार ८२.जननमरण ६४.सखा ६७.नस ६८.रसदार ६९.वंदनीय ७२.रटाळ ७४.रटरट ७६.तडकाफडकी ७७.रोज ७८.कसर

उभे उत्तर

१.नमनाला घडाभर तेल २.रास्त ३.मकर ४.सवत ५.रत ६.रयत ७.कायापलट ८.साव ९.रतन १०.दामिनी १३.रकमपात १५.फार १६.पलायन १८.वर्ण १९.तडक २१.चाड २२.बाकी २३.मानसकन्या २४.कराल २७.दरवाजा २९.जयजयकार ३०.बद्ध ३१.सवाई गंधर्व ३६.गज ३८.चाराचुरा ४०.लयास जाणे ४१.आत्या ४३.राकट ४५.हवालदार ४७.आसपास ५०.पोळ ५३.तार ५४.पपनस ५५.तलम ५६.चवदार ५७.परसदार ५८.उमा ६१.सुरवंट ६२.जनमत ६३.रडारड ६५.खारट ६६.पाय ७०.नीरस ७१.मोका ७३.टाकी ७५.रस्ता

वृत्तविशेष...

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन; अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली राष्ट्रीय एकात्मतेची शपथ



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी श्री. कव्हळे यांनी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.

यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, नायब तहसीलदार प्रमोद करे, नाझर गजानन मोतेकर यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक

# नगरपालिका निवडणूक खर्च समित्यांसाठी मार्गदर्शन सभा

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी** : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील ११ नगरपालिकांमध्ये उमेदवार खर्च समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या कार्यात सुसूत्रता, पारदर्शकता आणि नियमबद्धता आणण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात मार्गदर्शनपर सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा जिल्हा खर्च देखरेख समिती सदस्य सचिव प्रकाश राठोड यांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवार खर्च समित्यांनी अनुसरावयाच्या कार्यपद्धती, निकष व जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणामध्ये उमेदवारांनी केलेल्या दैनंदिन खर्चाची नोंद, पडताळणी आणि ताळमेळ कसा ठेवायचा याची प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली. खर्चासंबंधी सर्व पुरावे, पावत्या व दस्तऐवज नियमानुसार सुरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व उमेदवारांनी खर्च मर्यादेचे काटेकोर पालन करावे यासाठी खर्च समित्यांनी कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे, यावर मार्गदर्शन करण्यात आले.

या मार्गदर्शन सभेला जिल्ह्यातील ११ नगरपालिकांमधील तसेच उपकोषागार आणि पंचायत समित्यांमधील लेखा अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खर्च ताळमेळ व संबंधित प्रक्रियेबाबत उपस्थितांनी विचारलेल्या शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले.

# महादजी दर्याजी पाटील विद्यालयातील शिक्षकांचे पक्षीप्रेम! सुस्त अवस्थेत सापडलेल्या बगळ्याला दिले जीवदान

**बेलगाव** : महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालय, बेलगाव येथील शिक्षकांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेमुळे एका बगळ्याचा जीव वाचला असून परिसरात त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

बुधवारी सकाळी सुमारे १०.३० वाजता विद्यालयाच्या मैदानावर एक बगळा सुस्त अवस्थेत विद्यार्थ्यांना दिसला. विद्यार्थ्यांनी त्या पक्ष्याभोवती घोळका करून निरीक्षण करत असताना शिक्षक खुशालराव मेटांगळे व विनोद मेटांगळे घटनास्थळी पोहोचले. बगळा उडू शकत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने तज्ञांची मदत घेण्याचे ठरवले.



प्रथम डोणगावचे डॉ. बोचरे यांच्याशी संपर्क साधून पक्ष्याची माहिती देण्यात आली. त्यांनी ग्लुकोन-डी देण्याचा सल्ला दिला, मात्र बगळा काहीही खात किंवा पित नव्हता. त्यानंतर जानेफळ येथील शिक्षक व पक्षीमित्र म्हस्के सरांशी संपर्क साधला असता, त्यांनी आरएफओ यावळे साहेबांचा संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिला.

यानंतर डोणगाव विभागातील गजानन वीर यांच्या समन्वयातून वनविभागाशी संपर्क साधण्यात आला. अखेरीस वनपाल सहाय्यक विद्यालयात आले आणि मुख्याध्यापक दीपक कुटे, मेटांगळे सर आणि इतर शिक्षकांच्या उपस्थितीत बगळा त्यांच्या ताब्यात सुरक्षितरित्या देण्यात आला.

शिक्षकांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि जीवसृष्टीबद्दलचे प्रेम यामुळे एक बगळा वाचविणे शक्य झाले. स्थानिक परिसरात या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ऑनलाईन गेमिंग, शेअर मार्केटचा नाद, बँक मॅनेजरच बनला चोर; १ कोटी ७ लाख घेऊन नागपुरला पळाला

**भंडारा/प्रतिनिधी** : ऑनलाईन गेमिंगच्या नादात तरुणाई स्वत:चे आर्थिक नुकसान करुन कुटुंबाला त्रास सहन करावा लागत असल्याच्या अनेक घटना गेल्या काही महिन्यांपासून समोर येत आहेत. विशेष म्हणजे काही म हिन्यांपूर्वी धाराशिवमध्ये एका युवकाने ऑनलाईन जुगाराच्या आहारी जाऊन कर्जबाजारी झाल्याने आपलं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती. या घटनेनंतर ऑनलाईन जुगार आणि गावखेड्यातील तरुणाईचा मुद्दा चर्चेत आला. मात्र, अद्यापही ऑनलाईन जुगाराच्या नादात तरुणाई आर्थिक खाईत जात असल्याचे दिसून येत आहे. भंडाऱ्याच्या तुमसर येथील कॅनरा बँकेतील सहायक मनेजरने बँकेतील रक्कम ह्या ऑनलाईन गेमिंच्या नादातच लुटल्याचे समोर आले आहे.

एखाद्या सिनेमाला शोभेल असा चोरीचा प्रकार भंडाऱ्यात उघडकीस आला. भंडाऱ्याच्या तुमसर तालुक्यातील चिखला मॉइल्सच्या कॅनरा बँकेत काल चोरी झाल्याचा प्रकार समोर आला होता. चक्क बँकेतील मॅनजरनेच ही चोरी केली असून तब्बल दीड लाख रुपयांची बँकेतील रोकड बँकेच्या सहाय्यक मॅनेजरनेचे लुटल्याची धक्कादायक बाब या घटनेतून समोर आली. याप्रकरणी भंडारा पोलिसांनी चिखला मॉइल्स येथील कॅनरा बँकेचे सहाय्यक मॅनेजर मयूर नेपाले (३२) याला अटक केली आहे.

ऑनलाइन गेमिंग, शेअर मार्केट ट्रेडिंगचे कर्ज, यासोबत अन्य असे लाखो रुपयांचे कर्ज असल्यानं ते परतफ ेड करण्यासाठी सहाय्यक मॅनेजरनेच बँक लुटली. या बँके मॅनेजरकडून पोलिसांनी ९६ लाखांची रोकड जप्त केली आहे. यासह या चोरीच्या रकमेसाठी वापरण्यात आलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनासह मोबाईल व अन्य असा १ कोटी ७ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे कामकाज सुरळीत

- नवीन पात्रता प्रमाणपत्र प्रक्रिया लवकरच सुरू होणार
- गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे सर्व नियमित कामकाज सुरळीत सुरू असून, लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या व्याज परताव्याचे वितरण कोणत्याही अडथळ्याविना नियमितपणे केले जात आहे. सप्टेंबर २०२५ अखेर होल्ड व स्थगित प्रकरणे (ब्लॉक प्रकरणे वगळता) सोडून, व्याज परताव्यासाठी दावा करणाऱ्या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर परतावा जमा करण्यात आला आहे.

काही माध्यमांमध्ये महामंडळाचे कामकाज बंद असल्याच्या प्रसारित झालेल्या बातम्यांवर महामंडळाने स्पष्टीकरण दिले आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) संबंधीची प्रक्रिया काही तांत्रिक कारणांमुळे तात्पुरती स्थगित करण्यात आली होती, मात्र व्याज परतावा व बँक मंजुरी प्रकरणांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

अहिल्यानगर येथील गैरप्रकारांबाबत गुन्हा दाखल

नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील काही एजंट आणि ट्रॅक्टर एजन्सी यांनी संगनमत करून, एकाच मोबाईल क्रमांक वापरुन अनेक प्रकरणे महामंडळाकडे दाखल केली होती. त्यातील काही व्याज परताव्याचे पैसे एजंटने स्वत:च्या खात्यावर घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे. या माहितीची दखल घेत, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी अहिल्यानगरच्या पोलिस अधीक्षकांना त्वरित कारवाईसाठी पत्र दिले. पोलिस अधिक्षक यांनी तातडीने प्रकरणाची दखल घेत संबंधितांवर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. नाशिक व अहिल्यानगर या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अनियमिततेबाबत गुन्हे दाखल झाले असून, या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे. अशा घटना राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील एजंटमार्फत किंवा इतर यंत्रणांमार्फत घडल्या आहेत का, याची तपासणीदेखील महामंडळ करीत आहे.

नाशिक व अहिल्यानगर येथे घडलेल्या गैरव्यवहारासारखी प्रकरणे अन्य ठिकाणी घडू नये यासाठी प्रणाली लागु करण्यात येत आहे. एजंटमार्फत दाखल केलेली अशी प्रकरणे महामंडळाने तात्पुरत्या स्वरुपात ब्लॉक केली आहेत. ज्या लाभार्थ्यांची प्रकरणे ब्लॉक केली आहेत अशा लाभार्थ्यांनी त्यांच्या मुळ कागदपत्रांसह आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयक यांना संपर्क करावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क क्रमांक www.udyog.mahaswayam.gov.in प्रणालीवर उपलब्ध आहे. यापुढे नागरी सुविधा केंद्र वगळता, अन्य प्रकरणी एकच मोबाईल क्रमांक/लॉगीन करुन एकच प्रकरण दाखल करता येईल, अशी सुधारणा महामंडळाने प्रस्तावित केली आहे. पात्रता प्रमाणपत्र (LOI) च्या प्रक्रीयेमध्ये तांत्रिक सुधारणा पुर्ण करुन, शक्य तेवढ्या लवकर नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) सुरु करणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक यांनी दिली.

पान १ वरून...

## 'स्थानिक' निवडणुकांवर...

सरकारच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली होती.

५०% आरक्षण मर्यादा ओलांडू नका, नाहीतर निवडणुकाच रोखू, हा न्यायालयाचा स्पष्ट इशारा.

बांठिया आयोगाची वैधता नंतर तपासू, पण सद्यस्थितीनुसार निवडणूक प्रक्रिया चालली पाहिजे, असे त्या वेळी कोर्टाने म्हटले होते. केंद्र सरकारचे कायदेशीर प्रतिनिधी तुषार मेहता यांनी अधिक वेळ मागितला होता त्या संदर्भातही कोर्टाने नाराजी दर्शवली होती.

काय आहे नेमका वाद?

विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. राज्य सरकारचा दावा मात्र असा की, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे.

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुका वेळापत्रकानुसार सुरू

आरक्षण वाद असूनही २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक वेळापत्रक सुरूच आहे

१९-२१ नोव्हेंबर: अर्ज मागे घेण्याची मुदत

२६ नोव्हेंबर: अंतिम उमेदवार यादी

२ डिसेंबर: मतदान

३ डिसेंबर: निकाल

राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या निवडणुका 'मिनी विधानसभा' मानल्या जातात. त्यामुळे आरक्षणाचा वाद आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय याकडे सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागून आहे.

## गँगस्टर लॉरेन्स बिश्वोईचा...

बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याबद्दल अटक करण्यात आली होती.

तो भारतातील राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) वॉन्टेड यादीत आहे. एनआयएने त्याच्या डोक्यावर १० लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केले आहे.

बाबा सिद्दीकीचें चिरंजीव आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते झीशान सिद्दीकीने मंगळवारी पीटीआय वृत्तसंस्थेला सांगितले की, त्यांना अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाकडून एक ईमेल मिळाला आहे ज्यामध्ये अनमोलला अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले आहे. झीशान म्हणाले की, अनमोलला भारतात आणून त्याच्या गुन्ह्यांसाठी खटला चालवावा.

सलमान आणि बाबा हत्या प्रकरणात अनमोलचे नाव समोर

मार्च २०२३: सलमान खानला लॉरेन्स टोळीकडून धमक्या मिळाल्या. त्यानंतर, महाराष्ट्र सरकारने सलमानला वाय+ श्रेणीची सुरक्षा दिली. एनआयएने म्हटले आहे की, तुरुंगात बंद असलेल्या गँगस्टर लॉरेन्सने ज्यांना जिवे मारण्याची धमकी दिली होती, त्या १० जणांच्या यादीत सलमान खान अव्वल आहे. १९९८ च्या काळवीट शिकार घटनेमुळे बिश्नोई समुदाय संतप्त आहे, ज्याचा उल्लेख करून लॉरेन्सने टीव्ही मुलाखतीत सलमानला जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर, १४ एप्रिल २०२४ रोजी मोटारसायकलवरून आलेल्या दोन लोकांनी सलमानच्या घरावर गोळीबार केला.

लॉरेन्स कोण आहे? ७०० हून अधिक शूटर

लॉरेन्सचा जन्म १२ फेब्रुवारी १९९३ रोजी पंजाबमधील फाजिल्का येथे झाला. त्याचे वडील पोलिस कॉन्स्टेबल होते. त्याच्या आईचे नाव लॉरेन्स होते. पोलिस रेकॉर्डमध्ये त्याचे नाव सतविंदर सिंग आहे. लॉरेन्स टोळीचे जाळे जगभर पसरलेले आहे. असे म्हटले जाते की त्याच्या टोळीत ७०० हून अधिक शूटर आहेत, त्यापैकी ३०० हून अधिक पंजाबचे आहेत. ते पंजाब, हरियाणा, राजस्थान, दिल्ली आणि हिमाचल प्रदेशातून काम करतात.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते किसान सन्मान निधीचा २१ व्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण

## बुलढाणा कृषि विज्ञान केंद्रात कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी** : देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते किसान सन्मान निधी योजनेचा २१ वा हप्ता वितरण तथा दक्षिण भारत नैसर्गिक शेती संमेलन कार्यक्रमाचे आभासी प्रक्षेपण आज कोईम्बतूर, तामिळनाडू येथून करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मोठ्या संख्येने लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. मार्गदर्शनासाठी आत्मा प्रकल्प उपसंचालक दीपक बुटे, कृषि विज्ञान केंद्र कृषी शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, संचालक मंगेश जाधव, आत्माचे गजानन चौधरी, भारत कापसे तसेच कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना डॉ. नरेंद्रकुमार देशमुख यांनी लाभार्थी शेतकऱ्यांना कृषि विज्ञान केंद्राची भूमिका, शेती विकासासाठी केंद्रातर्फे केले जाणारे प्रयत्न याबाबत माहिती दिली. दीपक बुटे यांनी आत्मा प्रकल्प तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले.

कोईम्बतूर येथील मुख्य कार्यक्रमाचे आभासी प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व अधोरेखित करून शाश्वत शेती पद्धती अवलंबण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मनेश यदुलवार यांनी केले. जिल्ह्यातील अनेक शेतकरी बांधव आणि महिला शेतकऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील डॉ. जगदीश वाडकर, डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, डॉ. सुकेशनी वाणे, प्रवीण देशपांडे, डॉ. भारती तिजारे, डॉ. अनिल तारू, मनेश यदुलवार यांच्यासह शिवाजी पिसे, नितीन काटे, कोकिळा भोपळे, नंदकिशोर ढोरे, अनुराधा जाधव, अनिल जाधव, कृष्ण चौरे आणि गणेश इंगळे यांनी परिश्रम घेतले.